


**सुविचार :–**

*आपके कर्म ही आपकी पहचान है! वरना एक नाम के हजारों इंसान है!*

Institution has developed its vision and mission.

**Vision** :

"Determined for excellence in Social Work Education".

**Mission** :

We at BPNISW shall work continuously to achieve-

1. To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential
3 To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality
4 Providing Social Work Education for both personal and social transformation
5 Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.

**Core values:**

- An unwavering faith in Human dignity
- An abiding faith in duty towards other individuals and society

## सवित्रीबाई फुले जयंती संपन्नः–

_**महाविद्यालयात 03 जानेवारी 2019** रोजी **सावित्रीबाई फुले जयंती** निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून त्यांच्या कर्तृत्वाविषयी विद्यार्थ्यांना उद्‌बोधित करण्यात आले. **महाराष्ट्रातील पहिली शिक्षिका** म्हणून गौरविन्यात आलेल्या सावित्रीबाई बदद्ल विद्यार्थ्यांनामधे त्यांच्या कार्याचे मोल व कर्तृत्वाविषयी कृतज्ञनता व्यक्त केली गेली. **सावित्रीने महिलांना शिक्षणाचा** धडा दिला म्हणून महिलांना स्वाभिमान मिळवता आला. अश्या प्रकारचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रस्तुत कार्यक्रमाला विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## महाविद्यालयात पालक सभा संपन्नः–

**दि. 06/01/2019** रोजी प्राचार्य **डॉ. तुळणकर** यांच्या **अध्यक्षतेखाली** पालकसभेचे आयोजन केले गेले होते. या **सभेत शिक्षकांना पालकांशी संवाद साधला**. यामध्ये आपल्या विषयाचे महत्व पालकांना सांगितले त्यासोबत **नॅक कोर्डिनेटर डॉ. सिमा लोबो** यांनी **नॅक विषयी माहिती** देत व **NAAC ACCREDITATION** होणे कसे महत्वाचे आहे त्यात पालकांची भूमिका कोणती असेल या बदद्ल माहिती इदिली. तसेच संपूर्ण महाविद्यालयाची पाहिणी करित ग्रंथालयाविषयी माहिती देताना ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना कोण–कोणत्या सोयी सुविधा दिल्या जातात कि जेणेकरून विद्यार्थी आपले भविष्य उज्जवल करू शकतील याविषयी पालकांना माहिती दिली.

## मराठी प्राध्यापक परिषदेत सहभागः–

**दि. 05 व 06 जानेवारी 2019** रोजी झालेल्या **मराठी प्राध्यापक परिषदेत 'मराठी विषयः समाजकार्य अभ्यासक्मातील** आव्हाने' या **विषयावर परिसंवादात वक्ते म्हणून प्राध्यापक डॉ. रेखा जगनाळे** यांचा सहभाग होता.

हा परिसंवाद मराठी **परिषदेचे 39वें अधिवेशन** भवभूति कॉलेज, आमगांव येथे संपन्न झाला होता.





## माजी विद्यार्थी सभाः–

दि. 12 जानेवारी 2019 रोजी माजी विद्यार्थ्यांची सभा प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. याप्रसंगी उपस्थित माजी विद्यार्थ्यांना नॅक कोर्डिनेटर डॉ. सिमा लोबो यांनी **NAAC ACCREDITATION** होणे कसे महत्वाचे आहे यासंबंधी विस्तृत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी स्वताहाची माहिती देत आज आम्हाला नौकरी करत असताना महाविद्यालयातील शिक्षणाचे फायदे कसे उपयोगी पडत आहे हे सांगितले.

याप्रसंगी प्राचार्यांनी माजी विद्यार्थ्यांना नॅक विषयी माहिती दिली व माजी विद्यार्थ्यांच्या विषयी समाजकार्य शिक्षणाचे महत्व जाणून घेतले व उज्वल भविष्याबदद्ल शुभेच्छा दिल्या.

## समाजकल्याण अधिकारी CEO (माजी विद्यार्थी) यांची महाविद्यालयाला भेट –

दि. 10 जानेवारी 2019 रोजी **समाजकल्याण अधिकारी श्रीयुत अनिलजी वाळके CEO (माजी विद्यार्थी, श्री. भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर)** यांनी महाविद्यालयाला भेट दिली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी श्रीयुत वाळके यांचे स्वागत केले व त्यांना संपूर्ण महाविद्यालय परिसर फिरविला. एकुणच झालेला बदल पाहता त्यांनी त्यांच्या वेळी असलेल्या सोयी संविधा बदद्ल मत व्यक्त केले व आजचे विद्यार्थी किती सायी सुविधंमधे शिकतात असे म्हटले. महाविद्यालयातील बदलांमधिल नव्या प्रकल्पांविषयी त्यांना माहिती दिली.



## महाराष्ट्र मतदार दिवस संपन्न :–

दि. 25 जानेवारी 2019 रोजी महाविद्यालयात **महाराष्ट्र मतदार दिवस** साजरा करण्यात आला. या वेळी श्री. कमलाकर ढबाले. श्री. रूपेश ढाले, श्रीमती. शर्मिला दरणे, श्री. सत्यवान रामटेके हे उपस्थित होते. याप्रसंगी मतदारांना ओळख पत्र वाटप करण्यात आले.



**'ग्रामीण संस्कृती आणि साहित्य' या विषयावर**, उद्बोधन:–

डॉ. रेखा जगनाळे यांनी **'ग्रामीण संस्कृती आणि साहित्य'** या विषयावर उद्बोधन देताना ग्रामीण संस्कुती जतनात साहित्याचे योगदान कसे आहे आज जागतिकीकरणामुळे ग्रामीण संस्कुति लोपपावत चालेली आहे आणि त्या करिता समाजकार्यकर्तेयांची मध्यथी ग्रामीण संस्कृति जतन करू शकेल अन्यथा भविष्यात केवळ साहित्यातूनच संस्कृति पाहायला मिळेल असे वक्तव्य केले.



## महाविद्यालयाच्या प्रजासत्ताकदिन संपन्न:–

**संस्थेत प्रजासत्ताक दिन संपन्न :**

26 जानेवारी 2019 ला नागरिक शिक्षण संस्थेच्या प्रांगणावर श्रीयुत माधवजी झोड, माजी प्रादेशिक आयुक्त, नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचा प्रजासत्ताक दिन संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सर्वगणमान्य पदाधिकारी उपस्थित होते. तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. अनंत बरडे यांनी सूत्रसंचालन केले व आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



## राष्ट्रीय सेवा योजना विशेष ग्रामीण शिबीर संपन्न :–

महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विशेष ग्रामिण शिबीर दि. १५ जानेवारी ते २१ जानेवारी २०१९ या कालावधीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत परिसर, बोरगांव (कलांद्री) ता. उमरेड जि. नागपूर येथे सपंन्न झाले. विशेष ग्रामीण शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणुन उपसभापती, पंचायत समिती, उमरेड श्री. इटनकर आणि प्रमुख अतिथी मध्ये गटग्रामपंचायतचे सरपंच सौ. दांडेकर , माजी सरपंच श्री. दांडेकर, डॉ. दिलीप बारहाते नागपूर तसेच श्री. मधुकर शेंडे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी कार्यक्रम अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर, विशेष शिबीर प्रमुख डॉ. विलास घोडे, डॉ. नंदा पांगुळ व सौ. पाटील व इतर ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. या ग्रामीण शिबीरामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या ग्रामीण शिबीराचा समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी श्री. गौरीशंकर देशमुख, सरपंच सौ. संगिता दांडेकर, माजी सरपंच श्री. अनिल दांडेकर , डॉ. दिलीप बारहाते, समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत तुलणकर, महाविद्यालयाचे शिबीर प्रमुख डॉ. विलास घोडे, डॉ. नंदा पांगुळ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या रासेयो विशेष ग्रामीण शिबीरामध्ये महाविद्यालयाचे ९० स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी शिबीरप्रमुख व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.विलास घोडे, डॉ. नंदा पांगुळ, श्री.मोहन धापोडकर, अनुराग ढोलेकर, सचिन चहांदे, विवेक सहारे, मुकुल पराते,विश्वास शेंडे, भाग्यश्री भोंबले, साक्षी लाचरवार, आशिष गायकवाड, दहीवलकर, मरसकोल्हे इतर स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



*क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव संपन्न "*

२०१८–१९ मधील "क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव" दि. २८ ते ३० जानेवारी २०१९ या काळात सपंन्न झाला.

क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ. एल. एस. तुळणकर यांच्या हस्ते करण्यात आले. दि. २८, २९, व ३० जानेवारी २०१९ या तीन दिवशीय महोत्सवानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. दि. २९ जानेवारी २०१८ रोजी सकाळी ११.३० वा. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व विद्यापीठ गीताने सांस्कृतीक कार्यक्रमाची सुरूवात झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपला कलाविष्कार सादर केला.

महोत्सवाचा समारोपीय व बक्षीस वितरण कार्यक्रम दि. ३० जानेवारी २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा. प्राचार्य श्री. रमेशजी दुरगकर, प्रमुख अतिथी मा. श्री. अनिल वाळके, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर , विशेष अतिथी म्हणून नागरिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. अरूणजी देशमुख,महाविद्यालय विकास कमिटी सदस्य, सत्कारमुर्ती प्रा. डॉ. अरूणा त्यागी, तिरपुडे कॉलेज ऑफ सोशल वर्क, नागपूर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.एस. तुळणकर यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी मा. श्री. अनिल वाळके, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर यांनी समाजकल्याण विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांची पुस्तके व संविधानाची प्रत महाविद्यालयाला भेट दिली. तसेच कार्यक्रमाच्या सत्मकारमुर्ती मा. प्रा. डॉ. अरूणा त्यागी यांनी आपल्या कॉलेज अनुभवातुन मुलांनी पुढील यशस्वी वाटचाल करण्यास प्रोत्साहीत केले त्यासाठी भरपूर अश्या टिप्स् दिल्या. यावेळी क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमात यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीसे मा. अतिथींच्या हस्ते प्रदान करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अनंत बरडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. रेखा जगनाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव समन्वयक डॉ. विलास घोडे यांनी अथक परिश्रम घेतले.









## नॅक विषयी मार्गदर्शनः–

दि. 26 जानेवारी 2019 रोजी महाविद्यालयात **के.डी.के. कॉलेज नागपूर** येथील **विभाग प्रमुख डॉ. अदिती तुळणकर** यांची उपस्थीती लाभली होती. त्यांनी महाविद्यालयाच्या नॅककमेटीला उत्कुष्ट नॅक कमेटीला सामोरे जाताना येणाऱ्या अडचणींना सहकार्य होऊ अश्या प्रकारचे उद्बोधन केले.

महाविद्यालयाच्या कमेटीतील सदस्यांनी प्रश्नोत्तराने अडचणी दूर करणऱ्याचा प्रयम्न केला. याप्रसंगी नॅक कोओर्डिनेटर **डॉ. सिमा लोबो** यांनी श्रीमती अदिती तुळणकर यांचे आभार मानले.

या प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचा मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

## राष्ट्रीय पर्यावरण परिषदेत सहभागः–

दि. 11, 12 व 13 जानेवारी 2018 ला या **प्रियदर्शनी कॉलेज वर्धा** येथील तीन दिवसीय **राष्ट्रीय पर्यावरण परिषदेत** महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. अनिल सरगर यांचा सत्राध्यक्ष म्हणून सहभाग होता.

प्रस्तुत कार्यक्रमात महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल सरगर यांनी **राष्ट्रीय पर्यावरण परिषदेत** सत्राध्यक्षीय भाषणात समाजकार्याच्या भूमिकेत पर्यावरणाचे योगदान या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.

